Vol II Issue VIII Feb 2013

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 8, Feb. 2013
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# धर्म परिषदांचा उद्देश् आवश्यकता आणि परिणाम

व्ही . के . भालेराव

***सारांश:***

तर्कसुसंगता आणि विचारशीलता हा तथागतांच्या उपदेशाचा स्थायीभाव होता . तर्कसुसंगता आणि विचारशीलता नसेल तर ते वचन भगवान बुद्धाचे नव्हे . भगवंताचे नेहमी बहुजन हिताय़ बहुजन सुखाय यावरच विचाऱ विमर्श केलेला होता . भगवान बुद्ध हे या जगातील आद्य समाज सुधारक आहेत . भारतात सर्वप्रथम भगवान बुद्धांनी धम्मचक्र प्रवर्तनाची ऐतिहासिक क्रांती केली . त्यानंतर चक्रवर्ती राजा सम्राट अशोक याने स्वतः भिक्खू मोगलीपुत्त तिस्स यांच्याकडून धर्मांची दीक्षा घेऊन संपूर्ण जंबुद्विपात आणि विदेशातही धम्माचा प्रचार आणि प्रसार केला होता . त्यानंतर आधुनिक काळात प . पू . बोधिसत्व डॉ . आंबेडकर यांनी दि . **14** आक्टोबर **1956** रोजी रविवारी विजयादशमीच्या दिवशी प्राचीन नागांची भूमी नागपूर येथे बद्ध धर्मांची दीक्षा घेऊन भारतात लोप पावलेल्या धम्माचे पुनरूज्जीवन करण्याचे ऐतिहासिक असे महान क्रांतीकारक कार्य केले . मुळचे ब्रम्हदेशचे निवासी व त्यावेळी उत्तरप्रदेशातील कुशीनगर येथे वास्तव्यास असलेले भारतातील एक जेष्ठ भिक्खू चंद्रमनी महास्थविर यांच्या हस्ते प्रथम डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या लाखो अनुयायांना त्यांनी धम्माची दीक्षा दिली .

***प्रस्तावना :***

या धर्मांतराने धर्मांतरीतांना मानसिक बळ मिळाले . स्वाभिमान मिळाला . ते हजारो वर्षाच्या गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाले . त्यांना वैचारिक स्वातंज्य मिळाले . धर्मांतरामुळे भारतातील हा नवबौद्ध समाज देश विदेशातील बौद्ध संस्कृतीशी जोडला गेला . झगातल्या बौद्धांच्या संपर्कात येऊलागला . स्वाभीमानाऩे हक्काने आपली प्रगती करून घेऊ लागला . घेल्या **56** वर्षातील बौद्ध समाजाची विविधांगी होत असलेली प्रगती ही भारतातील बौद्ध समाजाची फार मोठी सफलता आणि उपलब्धी आहे . यातील शैक्षणिक़ सामाजिक़ धार्मिक आणि कमी अधिक प्रमाणात आर्थिक प्रगती लक्षणीय आहे . सामाजिक आणि आर्थिक दृष्टया वंचित़ दुर्लक्षीत समाजाला बोधिसत्व डॉ . बाबासाहेब आंबेडकरांची लाभलेली ही अविस्मरणीय देणे आहे .

बौद्ध धम्म स्वीकारण्याचा अचूक निर्णय डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या मनाने फार पूर्वीच घेतलेला होता . शुक्रवार दि . **27** मे **1953** रोजी बुद्ध जयंती निमित्त नरे पार्क मुंबई येथे डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे अफाट जनसमुदायांसमोर भाषण झाले होते . त्यात ते म्हणाले़ “मी एक बौद्ध धम्माचा उपााक आहे . मी नुसताच बोध घेतलेला नाही व नुसते बोलतो असेही नाही़ तर प्रत्यक्ष कृती करून दाखवीन . माझे शेवटचे आयुष्याचे दिवस बुद्ध धम्माच्या प्रचरात खर्च करण्याचे निश्चित ठरविले अहो . मी हे बुद्ध धर्म प्रचाराचे शेत पेरणार आहे व त्याचे कोणते पीक येते हे पाहाणार आहे .” डॉ . बाबासाहेब आंबेडकरांना धर्म प्रचाराची किती तळमळ होती हे या विवचेनावरून स्पष्ट होते .

**उद्देश :-**

धर्मांच्या प्रचार आणि प्रसाराकरिता डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी जीवापाड कष्ट केले . या कार्याला पुढे वाढविण्यासाठी धम्म बांधवांवर काही जबाबर्दा याही सोपविल्या आहेत . दि . **15** ऑक्टोबर **1956** रोजी धर्मांतराच्या दुर्सया दिवशी केलेल्या भाषणात डॉ . बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की़ तुम्ही कृती केली पाहिजे . हा धर्म म्हणजे आपण गळयात एक मढ अडकून घेत आहोत़ असे मानू नका . बौद्ध धर्मांच्या दृष्टीने भारताचा भूमी सध्या शुन्यवत आहे . म्हणून आपण उत्तम रीतीने धम्म पाळण्याचा प्रयत्न केला पाहिज़े नाही तर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये . म्हणून आपण दृढ निश्चय केला पाहिजे . हे आपल्याला साधले तर आपण आपल्या बरोबर देशाचा इतकेच नव्हे तर जगाचाही उद्धार करू . कारण बौद्ध धर्मानेच जगाचा उद्धार होणार आहे . स्वहिताबरोबरच देश हिताचा एवढा व्यापक उपदेश डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास दिलेला आहे . धम्माची अनमोल देण दिलेली आहे . म्हणून या सद्धम्माचा़ धर्म उपदेशांचा सर्वसामान्य जनमाणसांपर्यंत प्रचाऱ प्रसार करणे हा धर्म परिषदांचा उद्देश आहे .

आजच्या काळातील धर्मपरिषदा म्हणजेच प्राचीन काळातील धर्म संगिती असे समजणे़ संबोधणे़ सर्वथा गैर आहे . कारण आजच्या धम्मपरिषदा आणि प्राचीन धर्म संगिती यांचे उद्देश भिन्न स्वरूपाचे आहेत . तथागतांच्या महापरिनिर्वाणानंतर लगेच इ . स . पू . **483** मध्ये भदंत महाकाश्यप महास्थविर यांच्या अध्यक्षतेखाली राजगृह येथे प्रथम धर्म संगितीचे आयोजन करण्यात आले होते . त्याकाळी लिपिचा शोध लागला नव्हता . त्यामुळे बुद्ध वचने त्यांच्या शिष्यांनी कंठस्थ केली होती . त्यात न्यूनाधिक बदल होणे संभवनीय होते . तेव्हा बुद्ध वचनांचे शुद्धत्व राखण्यासाठी त्यांचे सुसंगर संकलन करणे हा त्या धम्मसंगितीचा एक उद्देश होता . तसेच सुभद्रा सारखे काही भिक्षु बौद्ध आचार धर्माचे काटेकोर पालन करीत नव्हते . आचार धर्मात शिथीलता आणीत होते . त्यास प्रतिबंध करणे हा त्या धम्म संगितीचा दुसरा उद्देश होता

**Title :**’धर्म परिषदांचा उद्देश् आवश्यकता आणि परिणाम
**Source:Golden Research Thoughts [2231-5063]** व्ही . के . भालेराव **yr:2013 vol:2 iss:8**

(भगवान बुद्ध आणि त्यांचा धर्म .)

महापंडित राहुल सांकृत्यायन म्हणतात की प्रथम धर्म संगितीमध्ये धम्म आणि विनयाचे संगायन झाले . बुद्ध प्रशंसित 'उपाली' ने विनय सांगितला तर बुद्धाचे चिर अनुचर 'आनंद' ने धर्माचे संगायन केले . याशिवाय अनेक स्थविर भिक्खूंनी धर्म आणि विनय पृथर्कपृथक कंठस्थ करून अध्ययन आणि अध्यापनाचा भार उचलला होता . त्यांनी 'धम्म' आणि 'सुत्त' चे रक्षण केले . म्हणून त्यांना 'धम्मधर' 'सुत्तधर' म्हटल्या गेले . 'विनय'चे रक्षण करर्णाया स्थविरांना 'विनयधर' म्हणून संबोधिल्या गेले .

थोडक्यात भगवान बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर जेव्हा जेव्हा बौद्ध भिक्षूंमध्ये मतभेद निर्माण झाले तेव्हा तेव्हा निर्माण झालेले मतभेद दूर करण्यासाठी बौद्ध धम्म परिषदा आयोजित केल्या गेल्या . इथे हे उल्लेखनीय आहे की प्राचीन काळातील या धम्मसंगितीना अनेक विद्वानांनी धम्मसंगिती धम्मसंगिणी धर्म सम्मेलन महासभा धर्म सभा धर्म परिषदा इ . विविध नांवाने संबोधिले आहे . भगवंतांनी आनंदाला उपदेश करताना 1) क्षत्रिय परिषद 2) ब्राम्हण परिषद 3) गृहपति परिषद 4) श्रमण परिषद 5) चातुर्महाराजिक परिषद 6) त्रायस्त्रिंश परिषद 7) मार परिषद आणि 8) धर्म परिषद अशा आठ परिषदांचा (सभा) उल्लेख केलेला आहे . प्राचीन धर्म संगिती आणि आजच्या धम्म परिषदा यातील शब्दात साधर्म्य असले तरीही दोन्हीचे उद्देश भिन्न आहेत . तरी सुद्धा यातून एक निष्कर्ष काढता येतो की तात्विक दृष्टया परिषदांचे हेतू भिन्न असले तरी दोन्ही परिषदांचा एक समान गाभा समान सुत्र आहे ते म्हणजे तथागतांच्या उपदेशांचा शुद्ध स्वरूपात प्रचार आणि प्रसार करणे . मनातल्या सर्वच्या सर्व विकारांची जननी म्हणजे मनातला राग द्वेष मोह या तीन अवस्था आहेत . या तीन अवस्थांना मनातून काढून टाकणे . मन शांत करणे माणसाचे कल्याण साधण्यासाठी त्याच्या सुख प्राप्तीसाठी त्याच्या मनाची अवस्था धर्म दसनेने करणाकडे नेणे . हा धम्म परिषदाचा उद्देश आहे .

प . पू . डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक दृष्टया वंचित दुर्लक्षीत समाजाला बुद्ध धर्माची दीक्षा देऊन जीवन जगण्याची पद्धती दिली ज्यामुळे माणुसकीचे जीवन मिळाले . ही धार्मिक कांती चिरंतन राहावी चिरकाल टिकावी . त्यासाठी शहरे आणि खेडयात धर्माची चळवळ गतीमान व्हावी . ती शास्त्रशुद्धपणे चालविली जावी . बुद्ध धमाची पाळेमुळे खोलवर रूजावीत . चांगले भिक्खू चांगले धम्म प्रचारक निर्माण व्हावेत पंचशीलचे आचरण करावे . डॉ . बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित ठिकठिकाणी बुद्ध विहारे व्हावीत अर्धवट न राहता ती बांधून पूर्ण व्हावीत . ती ओसाड न राहाता त्यांची मनोभावे नीट निगा राखली जावी . बुद्ध धर्म संघाप्रती श्रद्ध निर्माण होण्यासाठी दररोज विहारात जावे दररोज जमले नाही तर दर रविवारी न चुकता विहारात जावे . त्यातून समाज निर्मिर्ती व बुद्ध धर्माची जडणघडण होईल अशा प्रकारचे वातावरण निर्माण होण्यासाठी भिक्खूंच्या धर्म देसनेतून जनतेला उपदेश दिला जावा . हा धर्म परिषदेचा उद्देश आहे . माणसांमध्ये तृष्णेचे अहंकाराचे भयानक महायुद्ध पेटले आहे . काही धर्मांध माथी बेबंद झाली आहेत . ही माणसे हृदयाचा संबंधच तोडून टाकीत आहेत . तृष्णेचा नाश करून माणसाच्या हृदयात करूणेचा शिडकाव करणे हा धर्म परिषदेचा उद्देश आहे . धर्म श्रवण करणे धम्म श्रवण करण्याची संधी प्राप्त करून देणे . हा धर्म परिषदेचा उद्देश आहे . चारिज्य माणसाला सभ्य बनविते . धर्म परिषदेतील उपदेशाने सभ्य व चारिज्यवान माणूस घडावा हा धर्म परिषदेचा उद्देश आहे . धर्म विचाराबरोबर आचारावर भर देणे धर्माचरणाने श्रद्धासंपन्न नागरिक बनणे धर्म राज्याची संकल्पना रूजवणे मानवी मनावर सुसंस्कार करणे सदाचारी जीवन जगण्यास प्रेरणा देणे एकूणच धर्म परिषदेमधून सदधर्माचा उपदेश देणे हा धर्म परिषदेचा उद्देश आहे .

**आवश्यकता :-**

माणूस बनवायची संस्कारक्षम प्रकिया सतत चालू राहणारी आहे . बुद्धाचा लोककल्याणाचा उपदेश मागे अडीच हजार वर्ष पुढे हजारो वर्ष नव्हे तर जगाच्या अंतापर्यंत मनाला सुखी करण्याचा मन दुः खमुक्त करण्याचा प्रयत्न करीत राहणार आहे . धर्ममित्र मिळविणे सद्धम्माचा वाटेकरी बनविणे या उदात हेतुने धर्माचे बीजारोपन धर्म परिषदेतून होऊ शकते म्हणून धर्म परिषदांचे आयोजन होण्याची आवश्यकता आहे . सद्धर्माचा आपण एक जरी वाटसरू निर्माण केला तरी धर्माचे आपण खरे वाटेकरी झालोत असे होईल . हे सर्व सद्धर्म श्रवणाने आचरणांने शक्य आहे . जगाच्या अंतापर्यंत धर्म लयास जाणार नाही . त्यासाठी वारंवार नित्य प्रबोधनाची गरज आहे . अनुभवाने धम्म जाणला तर धर्मची खरी जाणीव होते . 'धर्म चारी सुखं सेति' धर्माचे आचरण करणारा सुखाने झोपतो . त्याला झोपेच्या गोळया घेण्याची गरज भासत नाही . सब्ब रसो धम्मरसो जीनाति | धम्माचा रस चाखताच अन्य सर्व रस चाखताच अन्य सर्व सर्व रस फिके वाटू लागतात . धम्मरस सर्वोत्तम आहे . सुमधूर आहे . धर्मरस प्राषण करण्यासाठी धम्म परिषदा आयोजित करणे आवश्यक आहे .

भारतीय बैद्ध महासभेच्या विद्यमाने दिवंगत भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत नायगांव येथील पुरंदरे स्टेडियम मध्ये दि . 23 नोव्हेंबर 1968 रोजी अखिल भारतीय बौद्ध परिषदेचे आयोजन करण्यात आले होते . त्या बौद्ध परिषदेला पू . दलाई लामा व बौद्ध धम्माचे भाष्यकार जागतिक कीर्तीचे विद्वान बिक्खू भदंत डॉ . आनंद कौसल्यायन प्रमुख प्राहुणे म्हणून उपस्थित होते . महाविहार बावरीनगर दाभड़ नांदेड येथे महाउपासक डॉ . एस . पी . गायकवाड यांनी पौष पौर्णिमा दि . 2 व 3 जानेवारी 1988 रोजी पू . भदंत डॉ . आनंद कौसल्यायन यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन केले होते . बुद्धगया येथील तत्कालीन लॉर्ड ॲबॉट भदंत डॉ . धर्मविरानुवत्त महाथेरो थाईलंड हे त्या धर्म परिषदेचे उद्घाटक होते . तर विपश्यनाचार्य सत्यनारायण गोयंका गुरूजी यांचे त्या धम्म परिषदेत प्रदीर्घ प्रवचन झाले होते . तेव्हापासून बावरीनगर येथे दरवर्षी पौष पौर्णिमेस डॉ . एस . पी . गायकवाड हे सातत्याने अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करीत असतात . पौष पौर्णिमा दि . 9 व 10 जानेवारी 2012 रोजी महाविहार बावरीनगर दाभर्डनांदेड येथे रौप्य महोत्सवी (25 वी) अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद लाखोंच्या उपस्थितीत प्रचंड उत्साहाने संपन्न झाली . या धर्म परिषदेला दरवर्षी देश विदेशातील विद्वान भिक्खूंना धम्मदेसनेसाठी पाचारण केले जाते सतत दोन दिवस येथे लाखोंच्या संख्येने श्रद्धावान उपासक उपासिका शांत चित्ताने धर्म श्रवण करीत असतात .

या धर्म परिषदेचे वैशिष्टये हे की धर्मदेसना श्रवण करण्यासाठी रात्रंदिवस सतत दोन दिवस लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित राहतात . अत्यंत शांत चित्ताने धर्म श्रवण करतात . धर्म मंचावर केवळ भिक्खू आसनस्थ झालेले असतात . कोणीही मान्यवर मंचावर बसलेला नसतो तर तो सर्वसामान्य श्रोत्यात बसलेला असतो . त्यामुळे एक तर मोठेपणाचा प्रतिष्ठेचा 'मी' पणाचा अहंकार नष्ट व्हावा पूजनीय भिक्खूंप्रती भिक्खू संघाप्रती धर्माचरणाने आदरभाव बाळगला जावा हा त्यामागचा मुख्य उद्देश असतो . या बावरीनगरच्या धर्म परिषदेमधून प्रेरणा घेऊन आज सर्वत्र मोठया प्रमाणात धर्म परिषदांचे आयोजन केले जात आहे . धर्मदीक्षा सुवर्ण महोत्सवी वर्ष (2006) पासून धर्म परिषदा आयोजित करण्याची चळवळ अधिक गतीमान झाली आहे .

**परिणाम :-**

ठिकठिकाणी होत असलेल्या धर्म परिषदांमुळे जनमणसात वेगळी प्रतिमा निर्माण होत आहे . धर्म परिषदांमधून धर्माचा प्रचार प्रसार होत आहे . सततच्या प्रचारामुळे समाज डोळस बनत आहे . त्यातून बुद्ध तत्त्वज्ञान आणि बोधिसत्व डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार होत आहे . बौद्ध समाजातील अधिकारी कर्मचारी यांना या धर्म परिषदांत आपलाही सक्रीय सहभाग असावा असे वाटू लागले आहे . समाजापासून जे दूर राहतात त्यांनाही सामाजिक बांधीलकीची जाणीव होण्यास मदत होत आहे . धर्म परिषदा धम्म प्रबोधनाचे प्रभावी माध्यम बनले आहे . धर्म परिषदांमुळे लोक एकत्रित येत आहेत . चर्चा करीत आहेत . निर्णय घेत आहेत . वर्षानुवर्ष पडून असलेल्या जागेवर बुद्ध विहारांची निर्मिती होत आहे . बुद्ध विहारांसाठी नवीन जागा घेतली जात आहे . तेथे धर्म परिषदांचे आयोजन होत आहे . त्यामुळे विद्वान भिक्खूंनी धर्मदेसना श्रवण करायला मिळत आहे . नवनवीन कार्यकर्ते धर्म प्रचारक श्रामणेर भिक्खू तयार होत आहेत धर्म परिषदेमुळे धर्म चळवळ गतीमान होण्यास मदत होते . शिक्षीत अडाणी गरीब श्रीमंत त्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी होतात . वाचनालये ग्रंथालये निर्माण होत आहेत . बौद्ध साहित्य प्रकाशित होत आहे .

धर्म परिषदांमुळे पाली भाषा शिकण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे . प्रौढ माणसेही पाली भाषा शिकण्याचा प्रयत्न करीत आहेत . मुंबई येथील आयु . सुधाकर अर्जुन पवार हे वयाच्या **73** व्या वर्षी एम . ए . पालीची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत (दैनिक वृत्तरत्न सम्राट गुरूवार दि . **26** जुलै **2012**) . तरूणांना लाजवील अशी कामगिरी त्यांनी केली आहे . धर्म परिषदांमधून बुद्धांची सुत्ते कथा लोकांना सांगितल्या जात आहेत त्यामुळे लोकांमध्ये धर्माचा आवडी आणि गाडी निर्माण होत आहे . असे असेल तरी अनेक ठिकाणच्या धर्म परिषदा या राजकीय हेतुने प्रेरित होऊन आयोजित केल्या जात आहेत . त्यामुळे त्या राजकीय परिषदा बनत आहेत . राजकीय नेत्यांनी धर्म परिषदांना जरूर उपस्थित राहावे पण ते धम्म श्रवण करण्यासाठी . धम्म सांगण्यासाठी नव्हे . धम्म परिषदेतील वक्त्यांनी पूज्य भिक्खूंनी धम्म परिषदेत धम्माचा सखोल अभ्यास करून धर्म तत्त्वज्ञानांवर विवेचन करायला हवे . इतर धर्माचे दुर्गुण सांगत बसण्यापेक्षा सद्धर्माचे विचार सांगावेत . आपल्याकडे अनेक अभ्यासू उच्च विद्या विभुषीत विद्वान भिक्खू उपलब्ध आहेत . त्यांना धर्मदेसनेसाठी पाचारण केले जावे . उणीवा दूर करून शुद्ध स्वरूपात धर्म परिषदांचे आयोजन झाल्यास आयोजकाना धम्म प्रचारकांना आणि उपस्थितांना धर्म परिषदेतील प्रसन्न वातावरणाचा मनोमन आनंद होईल . पद पैसा प्रतिष्ठा आणि अहंकार बाजूला ठेवून बुद्ध विहार आणि धर्म परिषदेत आपणास निश्चितपणे बसता आले तर डॉ . बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेला बौद्ध आपण बनतोल याचा आनंद द्विगुणीत होईल .

संदर्भ :-


**1** . भगवान बुद्ध आणि त्यांचा धर्म ले . डॉ . भीमराव रामजी आंबेडकर .

**2** . बौद्ध कालीन भारत का इतिहास – ले . मुंशी एन . एल . खोब्रागडे

**3** . प्राचीन भारत (Ancient India) – ले . डॉ . दया प्रकाश

**4** . पाली साहित्य का इतिहास – ले . भिक्षु धर्मरक्षित

**5** . बुद्ध चर्य्या – ले . महापंडित राहूल सांकृत्यायन

**6** . बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञार्न ले . अनिल कठारे

**7** . महा परिनिब्बान सुत्तं – ले . अनिल कठारे

**8** . The Mahavama - Translated in English by - Vilhelm Geiger, (Colombo)

**9** . Revolution & Counter Revolution - Dr. B. R. Ambedkar

**10** . बुद्ध धम्माची **2500** वर्षे भाग – **1** बुद्ध कालीन तत्त्वविचार आणि बुद्ध धर्मसंपादक प्रा . पी . व्ही . बापट अनुवाद – प्रदिप श . म्हैसेकर .

**11** . निर्मळ धारा धर्माची – ले . आचार्य सत्यनारायण गाएंका .

**12** . सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर – ले . ज . वि . पवार .

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net